# पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. २३२/२०१२

"प्रा. जी. बी. कुलकर्णी अवॉर्ड फॉर दी बेस्ट टिचर इन कॉमर्स" पारितोषिकासाठी शिक्षकांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. **अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ८ डिसेंबर, २०१२ आहे.** सदरचे अर्ज पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे पाठवावेत. पारितोषिकासाठी आवश्यक असलेले नियम, अटी व इतर माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१) पारितोषिकाचे नांव : **"प्रा.जी.बी.कुलकर्णी अवॉर्ड फॉर दी बेस्ट टिचर इन कॉमर्स"**

२) पारितोषिकाची रक्कम **रुपये १,०००/—**

३) पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील ज्या महाविद्यालयात वाणिज्य अभ्यासक्रम शिकविला जातो, त्यांच्या प्राचार्यांनी वाणिज्य विषयातील पात्र शिक्षकाची (फक्त एकाच) शिफारस करावी. (मा. अधिष्ठाता, मा. शैक्षणिक विभागप्रमुख व मा. प्राचार्य या पारितोषिकासाठी अर्ज करु शकतात.)

४) पुणे, मुंबई किंवा इतर कोणत्याही मान्यवर विद्यापीठाची एम. कॉम. पदवी प्रथम प्रयत्नात किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

५) पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील संलग्न महाविद्यालयात वाणिज्य विषय शिकविण्याचा कमीतकमी दहा वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६) संबंधित शिक्षकास संशोधनात्मक प्रबंध, त्यासंबंधीचे प्रकाशन अथवा संशोधनात्मक लेखन इत्यादीचा अनुभव असावा.

७) **संबंधित शिक्षकाचा महाविद्यालयातील चांगल्या कार्यक्षमतेचा व वर्तणूकीसंबंधीचा गुप्त अहवाल मा. प्राचार्य यांनी अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे.** इतर कोणतेही उल्लेखनीय योग्यतेच्या कार्याचा अहवाल सादर करावा. (सोबत पाकीटावर गोपनीय अहवाल असा उल्लेख करावा.)

**आवश्यक आहे.** इतर कोणतेही उल्लेखनीय योग्यतेच्या कार्याचा अहवाल सादर करावा. (सोबत पाकीटावर गोपनीय अहवाल असा उल्लेख करावा.)

८) विद्यापीठातील विभागप्रमुख किंवा महाविद्यालयाच्या प्राचार्यांना स्वत:चा प्रस्ताव पाठवावयाचा असल्यास तो मा. विभागप्रमुखांनी मा. कुलगुरु यांच्यामार्फत व मा. प्राचार्य यांनी संस्था चालकांमार्फत पाठवावा.

९) प्राध्यापक हा पूर्णवेळ कार्यरत असणे आवश्यक आहे.

१०) हे पारितोषिक सन २०१२–१३ या वर्षासाठी फक्त **पुणे** शहर व जिल्हयातील संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांसाठी राहील.

सदरचा पारितोषिक वितरण समारंभ हा प्रतिवर्षी पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनी (दि. १० फेब्रुवारी, २०१३) आयोजित करण्यांत येईल.

उपकुलसचिव,
पदव्युत्तर प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे – ७
संदर्भ : प. प्रवेश/५२६०
दिनांक : २६.११.२०१२

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :
१) मा. प्राचार्य, पुणे शहर व जिल्हयातील संलग्न वाणिज्य महाविद्यालये.